सुधारणा व पुनर्वसन
दुरध्वनी क्र. ०२०/२६६८४५२८
ई-मेल- digpune-mh@gov.in

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
गृह विभाग
कारागृह उपमहानिरीक्षणालय,पश्चिम विभाग,
येरवडा, पुणे-४११ ००६

पुण्यश्लोक 300

---

जा.क्र.इएसटी/कारागृह शिपाई/ भरती/कागदपत्रपडताळणी/2355/२०२६/पवि-१(१), पुणे-६ दि. २०.०५.२०२६

**// उमेदवारांना सूचना //**

**विषय:- पोलीस आयुक्तालय, पुणे शहर यांचे संकेत स्थळावर प्रसिध्द झालेल्या अंतिम प्रतिक्षा यादीतील ०३ उमेदवारांचे मूळ दस्तऐवज पडताळणीबाबत..**

**संदर्भ:** - पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचेकडील पत्र क्र. आस्था/३(१)/का.शि.भ.२०२२-२३/माहिती/२०२५ दि.२१.०५.२०२५.

कारागृह विभागातील पश्चिम विभागातील कारागृहांतर्गत कारागृह शिपाई (अराजपत्रित गट - क) या संवर्गातील पदांकरीता निवड झालेल्या व प्रतिक्षासूचीवर असलेल्या एकूण १२६४ उमेदवारांची अंतिम निवडसूची व प्रतिक्षासूची पोलीस आयुक्तालय, पुणे शहर यांचे **https://punepolice.gov.in** या संकेतस्थळावर दिनांक ०९.०५.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

कारागृह विभागाचे पश्चिम विभागांतर्गत कारागृह शिपाई संवर्गातील अंतिम / प्रतिक्षा निवडयादीतील एकूण **०३** उमेदवार गैरहजर, निवड रद्द, राजीनामा बाबत विनंती केल्याने, इतर विभागात नियुक्ती झाल्याने त्यांचे प्रवर्गनिहाय अंतिम प्रतिक्षायादीत नमूद असलेल्या **०३** (सोबत जोडलेल्या यादीतील) उमेदवारांनी नमूद असलेल्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात अपलोड केलेले दस्तऐवज उदा. शैक्षणिक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र, वयाचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, समांतर आरक्षण संबंधी पुरावा व इतर दस्तऐवज यांची मूळ कागदपत्रे व त्यांच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतीसह स्वत: (प्रतिनिधी चालणार नाही) दस्तऐवज पडताळणीकरीता सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे **दिनांक २१.०५.२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता कारागृह उपमहानिरीक्षणालय, पश्चिम विभाग, येरवडा, पुणे-६** येथे समक्ष उपस्थित रहावे.

तसेच दस्तऐवज पडताळणीचे वेळी उमेदवाराने स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत महाआयटी प्राप्त ओखळपत्र व आवेदन पत्र, स्वत:चे आधारकार्ड व त्यांची स्वसाक्षांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. उमेदवारांनी मूळ दस्तऐवज पडताळणीकरीता निश्चित करण्यात आलेली दिनांक ही **https://mahaprisons.gov.in** या संकेतस्थळावर पहावी.

**मूळ दस्तऐवज तपासणीकरीता विहित प्रपत्र सोबत जोडण्यात आलेले आहे. सदर प्रपत्रातील सर्व माहिती अचूकपणे नमूद करण्यात यावी. व त्यासोबत नमूद केलेले सर्व मूळ कागदपत्रे व स्वसाक्षांकित प्रतीसह सोबत आणावयाचे आहेत.**

उमेदवार विहीत शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता धारण करीता नसल्याचे आढळून आल्यास किंवा दस्तऐवज पडताळणीकरीता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास उमेदवारास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व याबाबत उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

तसेच उपरोक्त नमूद दिवशी दस्तऐवज पडताळणीकरीता उपस्थित न राहिल्यास उमेदवारास नियुक्तीची आवश्यकता नाही असे गृहीत धरुन निवड रद्द केली जाईल व तद्नंतर या संदर्भात होणाऱ्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

मूळ दस्तऐवज पडताळणीकरीता उमेदवाराने स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे असून दस्तऐवज पडताळणी प्रक्रियेबाबत मा.कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, येरवडा, पुणे-६ यांचा निर्णय अंतिम राहील व तो सर्व उमेदवारांस बंधनकारक राहील.

**(मा.का.उ.म.नि. यांच्या आदेशान्वये)**

Dy. Inspector General of Prisons, W.R. Yerwada, Pune
सत्यमेव जयते

(रविंद्र कि.दिघे)
**स्वीय सहाय्यक**
कारागृह उपमहानिरीक्षक,
पश्चिम विभाग, येरवडा पुणे-६

कागदपत्र पडताळणी करीता दिनांक २१.०५.२०२६ रोजी  सकाळी १०.०० वाजता कारागृह उपमहानिरीक्षणालय पश्चिम विभाग येरवडा पुणे-६ कार्यालयाचे ठिकाणी उपस्थित राहावे.

निवड रद्द करण्यात आलेले उमेदवारांऐवजी प्रतिक्षासूचीनुसार उपलब्ध उमेदवार

| SR.No | Application Id | Chest No. | Name | DOB | Gender | Total Mark | CATEGORY | PARALLEL RESERVATION | SELECTION CATEGORY |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **OPEN GENERAL WAITING** | | | | | | | | | |
| 1 | 110378000070834 | 23775 | AJAY SHANKAR NAVAGHANE | 05-05-1999 | MALE | 133 | SEBC | NONE | WT OPEN GENERAL |
| **OBC FEMALE WAITING** | | | | | | | | | |
| 2 | 220378000022674 | 38589 | RUTUJA SUNIL GORE | 23-01-2002 | FEMALE | 124 | OBC | FEMALE RESERVATION | WT OBC FEMALE |
| **EWS FEMALE WAITING** | | | | | | | | | |
| 3 | 220378000010151 | 32843 | RUKSAR YUNUS SHAIKH | 10-02-1999 | FEMALE | 111 | EWS | FEMALE RESERVATION | WT EWS FEMALE |

Dy. Inspector General of Prisons, W.R. Yerwada, Pune

(स्वीयसहाय्यक)
कारागृह उपमहानिरीक्षक
पश्चिम विभाग, येरवडा, पुणे-६